



रयत शिक्षण संस्थेचे,

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर

ता. पलूस, जि. सांगली

दि. २४ मार्च २०२१

## प्राध्यापक प्रबोधनी व्याख्यानमाला

## भाषा आणि ज्ञानव्यवहार

### व्याख्याते : प्रा. तेजस चव्हाण

बुधवार, दिनांक २४ मार्च २०२१ रोजी महाविद्यालयातील प्राध्यापक प्रबोधनी २०२०-२१ (स्टाफ ॲकेडेमी) च्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत **'भाषा आणि ज्ञानव्यवहार'** या विषयावर मराठी विभागातील प्रा. तेजस चव्हाण यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. सुरुवातीस कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रतिमांना पुष्पार्पण करण्यात आले. डॉ. रवींद्र सोनवले यांनी स्वागत आणि परिचय करून दिला.

त्यानंतर प्रा. तेजस चव्हाण यांनी आपल्या मनोगतात मानवी जीवनातील भाषेचे योगदान स्पष्ट केले. माणसाच्या विकासक्रमामध्ये भाषेचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भाषेतूनच मनुष्याने ज्ञानसंहिताचे वहन केले आहे. मनुष्याच्या मनामध्ये कोणतीही कल्पना मातृभाषेतच येते. तेव्हा विद्यार्थ्यांना मातृभाषेतच व्यक्त होण्यासाठी प्राध्यान्य दिले पाहिजे. तरच विद्यार्थ्यांचा सर्जनशील विकास होऊ शकतो. अध्यापक म्हणून काम करत असताना शिक्षकांनी भाषेचा आणि ज्ञानाचा कसा समन्वय साधावा, हे स्पष्ट केले. आभार प्रा. प्रतिभा पुदाले यांनी मानले.

**निष्पत्ती :** १. भाषेचे मानवी जीवनातील महत्त्व लक्षात आले.
२. भाषेचा व ज्ञानाचा समन्वय कसा साधावा हे कळले.

**लाभार्थी :** वरीष्ठ महाविद्यालयातील अध्यापक सेवकवृंद. **संख्या :** 29





चेअरमन
प्राध्यापक प्रबोधनी

प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.